प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. २१.०९.२०२१

**कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माणयोजनेतील अर्जदारांना अनामत रक्कम भरण्याकरिता सिडकोच्या एम्पॅनल्ड बँकाकडून आवश्यकतेनुसार मिळू शकणार कर्ज**

सिडको महामंडळाच्या कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी गृहनिर्माण योजनेतील अर्जदारांना अनामत रकमेचा भरणा करण्याकरिता आवश्यकतेनुसार सिडकोच्या एम्पॅनल्ड बँकांकडून कर्ज मिळू शकणार आहे. हा निर्णय गृहनिर्माण योजनेकरिता अर्ज करणाऱ्या कोविड योद्ध्यांसाठी निश्चितच फायदेशीर ठरणार आहे.

**"अर्जदारांना अनामत रक्कमेची जमवाजमव सुलभतेने करता यावी यासाठी सिडकोने हे सकारात्मक पाऊल उचलले आहे. अर्जदारांनी आपल्या आवश्यकतेनुसार या सुविधेचा लाभ घ्यावा व आपल्या घराचे स्वप्न साकार करावे."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडकोकडून १५ ऑगस्ट २०२१ रोजी कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला असून या योजने अंतर्गत नवी मुंबईच्या तळोजा, कळंबोली, खारघर, घणसोली आणि द्रोणागिरी या ५ नोडमध्ये एकूण ४,४८८ घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. एकूण ४,४८८ घरांपैकी १०८८ घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी तर उर्वरित ३४०० घरे ही सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आहेत.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकारिता रु. २ लाख आणि सर्वसाधारण प्रवर्गाकरिता रु. २.५ लाख अनामत रक्कम लागू आहे. कागदपत्रे जमा करण्यासाठी व अनामत रक्कम भरण्याकरिता ०९ सप्टेंबर २०२१ ही अंतिम

तारीख असताना अर्जदारांनी केलेल्या विनंतीवरून यापूर्वीच ०७ ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदर मुदतवाढीनंतर अनेक अर्जदारांच्या विनंतीनुसार सिडकोने आपल्या एम्पॅनल्ड बँकांशी संपर्क साधून अर्जदारांना अनामत रक्कम भरण्याकरिता आर्थिक सहाय्य करण्याबाबत व्यवस्था करण्यास सुचवले. यानंतर एम्पॅनल्ड बँकांनी संबंधित अर्जदारांना अनामत रकमेचा भरणा करण्याकरिता कर्ज देण्यास अनुकूलता दर्शविली. यानुसार एम्पॅनल्ड बँकांची यादी योजनेच्या https://lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तथापि, अर्जदार व बँका यांमध्ये या संदर्भात करण्यात येणाऱ्या व्यवहारात सिडकोची कोणतीही भूमिका नसून अर्जदारांनी आपल्या जबाबदारीवर सदर बँकांशी व्यवहार करावा, असे सिडकोकडून कळविण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**